# मुंबई विद्यापीठ

परीक्षा विभाग/निकाल कक्ष
महात्मा फुले भवन,
विद्यानगरी, सांताक्रुझ (पूर्व),
मुंबई — ४०००९८.

**क्र.परीक्षा/निकाल कक्ष/ ८९७ २०१६**

परिपत्रक :—

मुंबई विद्यापीठाच्या विविध शैक्षणिक विभागांचे संचालक/प्रमुख, विद्यापीठाशी संलग्नित/विद्यापीठ संचालित कला, वाणिज्य, विज्ञान व व्यवस्थापन, महाविद्यालयाचे प्राचार्य, विद्यापिठाच्या दुर व मुक्त अध्ययन संस्थेचे प्राध्यापक नि संचालक, मान्यताप्राप्त संस्थाचे संचालक, विद्यापिठाच्या रत्नागिरी उपकेद्रांचे समन्वयक व विद्यापिठाच्या ठाणे उपकेंद्राचे मानद सल्लागार यांना या परिपत्रकाद्वारे पुन:श्च कळविण्यात येते की, एप्रिल/मे, २०१६ च्या परीक्षांसाठी ज्या शिक्षणक्रमाचे परीक्षाअर्ज M.K.C.L या अभिकरणामार्फत Digital University Portal वरून Online घेण्यात आलेले आहेत; अशा सर्व अभ्याक्रमांच्या/शिक्षणक्रमांच्या परीक्षांसाठी प्रविष्ठ झालेल्या विद्यार्थ्यांची पात्रता निश्चित (Eligibility Confirmation) करून त्याचा तपशील (Status) व विद्यार्थ्यांचे प्रथम व द्वितीय वर्षाच्या परीक्षांचे (सत्र परीक्षा १ ते ४) चे उत्तीर्ण व अनुत्तीर्ण बाबतचा तपशील (Lower Examination Report Status with Grade & Point) दि. १८ मे, २०१६ पर्यंत Digital University Portal वर नोंदवावेत.

पुढे असेही कळविण्यात येते की, ज्या विद्यार्थ्यांचे पात्रतेबाबतचा तपशील व सत्र परीक्षा १ ते ४ च्या उत्तीर्ण व अनुत्तीर्ण बाबतचा तपशील (Lower Examination Report Status with Grade & Point) Digital University Portal वर उपरोक्त दिनांकापर्यंत नोंदवलेला नसेल अशा विद्यार्थ्यांचे निकाल राखीव ठेवण्यात येतील.

तसेच विद्यार्थ्यांची संभाव्य गैरसोय टाळण्याच्या दृष्टीने संबंधीतांना पुन्हा असेही कळविण्यात येते की, विद्यार्थ्यांची पात्रता निश्चित झालेली आहे व विद्यार्थी सत्र १ ते ४ च्या परीक्षा उत्तीर्ण आहे असा एकही विद्यार्थ्यांचा तपशील Digital University Portal वर उपरोक्त दिनांकापर्यंत नोंदविणे प्रलंबित राहणार नाही याची दक्षता घ्यावी.

तरी वरील सर्व बाबींची संबंधीतांनी नोंद घेऊन योग्य ती पुढील कार्यवाही करावी.

(दीपक वसावे)
स्था.परीक्षा नियंत्रक

मुंबई — ४०००९८
दि. १२ मे, २०१६

प्रति :—
संचालक/प्रमुख, विद्यापीठाचे विविध शैक्षणिक विभाग
प्राचार्य, विद्यापीठाशी संलग्नित/विद्यापीठ संचालित कला, वाणिज्य, विज्ञान व व्यवस्थापन महाविद्यालये
प्राध्यापक नि संचालक, विद्यापीठाचे दुर व मुक्त अध्ययन संस्था
संचालक मान्यताप्राप्त संस्था
समन्वय, रत्नागिरी उपकेंद्र
मानद सल्लागार ठाणे उपकेंद्र

अ. प्रत माहितीस्तव व पुढील योग्य त्या कार्यवाहीसाठी

प्र. संचालक,संगणकीय सुविधा केंद्र, परीक्षा विभाग, मुंबई विद्यापीठ.

ब. प्रत माहितीस्तव अग्रेषित :—
१. समन्वयक, परीक्षा विभाग
२. सर्व उपकुलसचिव परीक्षा विभाग
३. सर्व सहाकुलसचिव परीक्षा विभाग

क. प्रत माहितीस्तव अग्रेषित :—
१. संचालक, विद्यार्थी कल्याण विभाग, मुंबई विद्यापीठ.
२ मा. कलगरू. यांचे कार्यकारी सचिव